प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, पहिला माळा, बी विंग
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ००१ ४४०
दुरध्वनी क्रं२५५६११६-०७१२ . , ई -मेल- apccfnodal@mahaforest.gov.in

क्रमांक कक्ष-१७/नोडल/२/आयडी-१३१२१(२९)/२६२०/२०२२-२३
नागपूर ४४० ००१, दिनांक: ०९ /०१/२०२३

प्रति,
**प्रधान सचिव (वने),**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

**विषय:-** वनजमिन-सिंधुदुर्ग
लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी मौजे निरुखे, ता. कुडाळ, जि. सिंधूदुर्ग येथील १८.९४ हे. वनजमीन वळती करणेबाबत.

**संदर्भ:-** १) शासन, महसूल व वन विभाग पत्र क्र. एफएलडी-२०२२/प्र.क्र.२८५/फ-१०, दिनांक १७/११/२०२२
२) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-६/नोसेल/सा.वाडी/इरीगेशन/२२-२३/ ११६८, दिनांक ०३/०१/२०२३

उपरोक्त विषयांकित पत्रान्वये लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी मौजे निरुखे, ता. कुडाळ, जि. सिंधूदुर्ग येथील १८.९४ हे. वनजमीन वळती करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत शासनाने खालील मुद्दे उपस्थित केलेले होते.

१. प्रस्तावित जमीनीच्या गा.न. नं. ७/१२ मध्ये काही खाजगी व्यक्तींची नावे दिसून येत आहे. प्रस्तावामध्ये त्यांचे सहमतीपत्र दिसून येत नाही. त्यामुळे खालील माहिती / कागदपत्रे सादर करावी.
२. प्रस्तावीत जमीन ही वनजमीन असल्याची व त्या जमीनीस वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदी लागू होत असल्याची खात्री केल्याबाबतची उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र.
३. खाजगी हक्कधारकांना प्रचलित नियमानुसार मोबदला देण्यासंदर्भातील प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र व खाजगी व्यक्तीचे सहमतीपत्र.

त्याअनुषंगाने संदर्भ पत्र क्र. २ अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांनी पुर्तता अहवाल सादर केलेला आहे. त्याची प्रत दोन प्रतींत यासोबत शासनास सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र:** पुर्तता अहवाल दोन प्रतींत

९/१/२३

**(नरेश झुरमुरे)**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी

**प्रतिलिपी**: मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांना माहितीस अग्रेषित.
**प्रतिलिपी**: उपवनसंरक्षक (प्रा.), सावंतवाडी वन विभाग यांना माहितीस अग्रेषित.

Dhule Circle/Id-2326/0.293 ha.

कार्यालय - ०२३१/२६५३६३२,
E-mail ID -
ccftkolhapur@mahaoforest.gov.in
ccftkolhapur@gmail.com

महाराष्ट्र वन विभाग

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय**

"वनवर्धन", ताराबाई पार्क, कोल्हापूर -४१६ ००३

क्रमांक कक्ष-६/नोसेल/सा.वाडी/इरीगेशन/२२-२३/ ११६८

कोल्हापूर -४१६००३ दिनांक - ~~१२/२०२२~~. 03/01/2023

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,

महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय :** Proposal under Forest (Conservation) Act, 1980
Diversion of 18.94 ha Forest land for construction of Minor Irrigation Tank in Village Nirukhe Tal. - Kudal, Dist. Sindhudurg, Division Sawantwadi in the state of Maharashtra

**संदर्भ :** १. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र FLD-२०२२/प्रक्र.२८५/फ-१० दिनांक १७.११.२०२२

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र कक्ष-१७/नोडल कोल्हापूर/आयडी-१३१२१/(२९)/२१०४/२०२२-२३ दिनांक २१.११.२०२२.

३. या कार्यालयाचे पत्र कक्ष-६/नोसेल/सा.वाडी/इरिगेशन/२२-२३/२३६२ दिनांक ७.१२.२०२२

४. उपवनसंरक्षक सावंतवाडी यांचेकडील पत्र अ/नोसेल//निरूखे/२२-२३/८८८ दिनांक १४.१२.२०२२

विषयांकित प्रकरणी वरील संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये सदर प्रस्तावामध्ये १ ते २ त्रुटी उपस्थित करण्यात आलेल्या आहेत. सदर त्रुटींचे अनुषंगाने पूर्तता करून आवश्यक दस्तऐवजासह अहवाल सादर करणेबाबत उपवनसंरक्षक सावंतवाडी यांना संदर्भ क्र.३ अन्वये कळविण्यात आलेले होते.

आता संदर्भ क्र.४ अन्वये उपवनसंरक्षक सावंतवाडी यांनी १ ते २ त्रुटींची पूर्तता करून अहवाल आवश्यक दस्तऐवजासह या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अहवाल तीन प्रतीत यासोबत सविनय सादर करण्यात येत आहे. उपवनसंरक्षक सावंतवाडी यांनी सादर केलेल्या त्रुटी पूर्तता अहवालास हे कार्यालय सहमत आहे. कृपया सदर प्रस्तावावर आपले स्तरावरून पुढील संस्करण होणेस विनंती आहे.

**सहपत्र :** वरीलप्रमाणे.

(आर.एम.रामानुजम)
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),**
**कोल्हापूर.**

4427
6/1/23
Kolhapur
6/1/23

**प्रतिलिपी :** उपवनसंरक्षक सावंतवाडी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

**प्रतिलिपी :** Executive Engineer, Minor Irrigation Division, Oros-Sindhudurg यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.



6/1/23

Phone No: 02363/ 272005
Email ID:dcfsawantwadi@gmail.com

**महाराष्ट्र शासन**
**उपवनसंरक्षक, सावंतवाडी वन विभाग यांचे कार्यालय**
**वन भवन सालईवाडा, सावंतवाडी, पिन कोड ४१६ ५१०, जि. सिंधुदुर्ग**

जा. क्र. अ/ नोसेल कक्ष/नि.पा.प्र./२०२२-२३/ ८८८
सावंतवाडी ४१६ ५१०, दि. १४.१२.२०२२

प्रति,

मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
कोल्हापूर

**विषय- वन जमीन- सिंधुदुर्ग**
लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी मौजे निरुखे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील १८.९४ हे. वनजमीन वळती करणेबाबत

**संदर्भ-** १. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. एफएलडी-२०२२/ प्र. क्र. २८५/फ-१०, दि. १७.११.२०२२

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१७/नोडल/२/आयडी-१३१२१/२१०४/२२-२३, दि. २१.११.२०२२

३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-६/नोसेल/सा.वाडी/ इरिगेशन/२२-२३/२३६२, दि. ०७.१२.२०२२

४. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस, सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र क्र. लपाविओ/ प्रशा-४/३०६१/२०२२, दिनांक ०५.१२.२०२२

निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्पकामी मौजे निरुखे, ता. कुडाळ येथील 18.94 हे. आर वनक्षेत्र वळतीकरण करणेबाबतचा प्रस्ताव विहीतमार्गाने शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावातील वळतीकरण करावयाच्या क्षेत्रासंबंधी शासनाकडून संदर्भ क्रमांक 1 अन्वये दोन मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर उपस्थित मुद्यांची खालीलप्रमाणे पूर्तता करणेत येत आहे.

| अ. क्र. | **उपस्थित मुद्दा** | **पूर्तता तपशील** |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावित जमीन ही वनजमीन असल्याची व त्या जमिनीस वन (संवर्धन) अधिनियम, 1980 च्या तरतुदी लागू होत असल्याची खात्री केल्याबाबतचे उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र | i) प्रस्तुत प्रस्तावातील जमिनीच्या वर्गीकरण संदर्भात तत्कालीन उपवनसंरक्षक यांनी Part- II, Inspection Report, Joint Inspection Report, Certificate No. 3, Certificate No. 12, Area Statement तसेच वनक्षेत्र सर्व्हेक्षक व वन सर्व्हेक्षक यांचा स्थळ निरीक्षण अहवाल सादर केले आहेत.<br>ii) सबब प्रस्तुत प्रस्तावासोबत सादर केलेली प्रमाणपत्रे व अभिलेखांच्या आधारे निम्नस्वाक्षरीकर्ता यांचे प्रमाणपत्र या सोबत सादर करणेत येत आहे.<br>**(सहपत्र क्रमांक 1 व 2 )** |
| 2 | खाजगी हक्कधारकांना प्रचलित नियमानुसार मोबदला देण्यासंदर्भातील प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र व खाजगी व्यक्तींचे सहमतीपत्र | कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस, सिंधुदुर्ग यांनी त्यांचेकडील पत्र क्र. लपाविओ/प्रशा-4/3061/ 2022, दिनांक 05.12.2022 मध्ये 'खाजगी हक्कधारकांना जमिनीच्या प्रस्तावित भूसंपादन प्रक्रियेअंतर्गत प्रचलित नियमानुसार जमिनीचा आवश्यक मोबदला देणे; तसेच भूसंपादन अधिनियम, 2013 नुसार भूसंपादन प्रक्रिया प्राथमिक स्थितीत असून, सदर खाजगी व्यक्तींचे सहमतीपत्र घेणे सदर अधिनियमानुसार अपेक्षित नसल्याने सदर सहमतीपत्र सादर करणेबाबत कार्यवाही करता येत नाही' असा आशय नमूद केला आहे. यास्तव सदरचे पत्र या सोबत सहपत्रित करण्यात येत आहे. **(सहपत्र क्र. 3)** |

(सोबत- वरीलप्रमाणे)

(एस. नवकिशोर रेड्डी)
**उपवनसंरक्षक**
**सावंतवाडी वन विभाग सावंतवाडी**

प्रत- कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस, सिंधुदुर्ग यांना संदर्भ क्र. 2 अन्वये माहितीसाठी

सहपत्र क्र. 1

**प्रमाणपत्र**

मौजे निरुखे, ता. कुडाळ येथील सर्व्हे क्रमांक 125/1, 125/2, 125/3, 130/ 1, 143/1, 149/2, 152/1, 152/2, 192/1, 192/4 मधील बाधित होणाऱ्या क्षेत्राचा परामर्श घेऊनच तत्कालीन उपवनसंरक्षक यांनी सदरचा प्रस्ताव विहीतमार्गाने शासनास सादर केला आहे. प्रस्तुत प्रकल्पकामी वळतीकरण करावयाच्या 18.94 हेक्टर क्षेत्रात समाविष्ट असलेल्या सर्व्हे क्रमांक 125/1, 125/2, 125/3, 130/ 1, 143/1, 149/2, 152/1, 152/2, 192/1, 192/4 मध्ये खाजगी व्यक्तींची नांवे दिसून येत असली तरी, महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, 1975 मधील संबंधित कलमांनुसार सदर जमीन 'वन' म्हणून गृहीत धरण्यात येते. प्रस्तावित जमीन ही वन जमीन असल्याची व त्या जमिनीस वन (संवर्धन) अधिनियम, 1980 च्या तरतुदी लागू होत असल्याची खात्री केली आहे.

सावंतवाडी,
दिनांक- 14 .12.2022

(एस. नवकिशोर रेड्डी)
**उपवनसंरक्षक**
**सावंतवाडी वन विभाग सावंतवाडी**

सहपत्र क्र.२

**स्थळ निरीक्षण अहवाल**

सावंतवाडी
दि. १६.०९.२०२१

प्रति,

मा. उप वनसंरक्षक
सावंतवाडी वन विभाग

विषय :- वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत करावयाच्या निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या १८.९४ हे.आर क्षेत्राची संयुक्त स्थळ पाहणी करण्याबाबत.
संदर्भ :- आपले कडील ज्ञापन क्र. ब/नोसेल कक्ष/निरुखे पाटबंधारे प्रकल्प/२१-२२/२०७५ दि. ०६.०९.२०२१

उपरोक्त संदर्भान्वये कुडाळ तालूक्यातील निरुखे लघु पाटबंधारे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत करावयाच्या १८.९४ हे.आर क्षेत्राची संयुक्त पाहणी करुन स्थळ निरीक्षण अहवाल सादर करणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहे. यानुसार दि. १५.०९.२०२१ रोजी उप अभियंता, लघू पाटबंधारे विभाग व त्यांचे कर्मचारी तसेच वनपाल श्री. ना. प. चव्हाण, वनरक्षक कडावल श्री. राऊळ व वनरक्षक पांग्रड श्री. क्षिरसागर तसेच वनमजूर यांच्या उपस्थितीत प्रकल्पासाठी बाधीत होणारे १८.९४ हे.आर वनक्षेत्राची जागेवर पाहणी व तपासणी केली. प्रकल्पासाठी बाधीत होणारे १८.९४ हे.आर वनक्षेत्राचे सर्व्हे नंबर ची माहिती खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | गांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | बाधीत होणारे वन क्षेत्र | वन / वनसंज्ञा / खाजगी वन |
|---|---|---|---|---|---|
| १ | निरुखे | १२५ | १ पैकी | ४.३९ | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत कलम ६ खाली मुक्त झालेले क्षेत्र. |
| २ | | १२५ | २ पैकी | १.२२ | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत कलम २२ अ खाली पून:स्थापित झालेले क्षेत्र. |
| ३ | | १२५ | ३ पैकी | १.६८ | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत कलम २२ अ खाली पून:स्थापित झालेले क्षेत्र. |
| ४ | | १३० | १ पैकी | ०.८० | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत कलम २२ अ खाली पून:स्थापित झालेले क्षेत्र. |
| ५ | | १४३ | १ | ०.४० | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत निर्णीत वन. (शासन वि.दी. |
| ६ | | १४९ | २ | ५.१२ | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत निर्णीत वन.(शासन वि.दी. |
| ७ | | १५२ | १ | ३.८७ | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत चौकशीवर प्रलंबित वन. |
| ८ | | १५२ | २ | ०.७३ | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत कलम २२ अ खाली पून:स्थापित झालेले क्षेत्र. |
| ९ | | १९२ | १ पैकी | ०.४९ | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत कलम २२ अ खाली पून:स्थापित झालेले क्षेत्र. |
| १० | | १९२ | ४ पैकी | ०.२४ | म.खा.व.स.अधिनियम १९७५ अंतर्गत कलम ६ खाली मुक्त झालेले क्षेत्र. |
| | | | एकूण | १८.९४ | |

सदरचे क्षेत्राची जागेवर खात्री केली असता, बाधीत होणारे १८.९४ हे.आर वनक्षेत्र बरोबर असल्याचे दिसून आले.

वन सर्व्हेक्षक
वन विभाग सावंतवाडी

वनक्षेत्र सर्व्हेक्षक
वन विभाग सावंतवाडी

Scanned by CamScanner

सहपत्र क्र. ३

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

# कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस-सिंधुदुर्गनगरी

मुख्य प्रशासकिय ईमारत, 'सी' विंग, दालन क्र. ३१२
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्गनगरी पीन-४१६८१२

दूरध्वनी क्र. : ०२३६२-२२८७१७ Email ID : eemido@gmail.com

**जा.क्र. लपाविओ/ प्रशा- ४/ 3069 /२०२२** **दिनांक :- 09/१२/२०२२**

प्रति,
मा. उप वनसंरक्षक
सावंतवाडी

उप वनसंरक्षक यांचे कार्यालय
सावंतवाडी वनविभाग-सावंतवाडी
आ.क्र. 3983/22-23
09 DEC 2022
कक्षाचे नांव : अभिज
स्वाक्षरी

विषय :- निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथील १८.९४ हे. वनजमीन वळती करणाबाबत

संदर्भ :-
१) शासन पत्र क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र. २८५/फ-१० महसूल व वनविभाग दि.१७/११/२०२२
२) या विभागाचे पत्र जा.क्र.२९८७ दि.२२/११/२०२२
३) आपले कार्यालयीन पत्र जा.क्र. ब/नोसेल कक्ष/नि.पा.प्र./२०२२-२३ /१७६४ दि.३०/११/२०२२

उपरोक्त संदर्भिय शासन पत्रान्वये निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. कुडाळ , जि. सिंधुदूर्ग येथील १८.९४ हे. वनजमीन वळती करणेबाबत प्रस्तावावर खाजगी हक्कधारकांना प्रचलित नियमानुसार मोबदला देण्यासंदर्भात प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र सादर करणेबाबत शासनाकडून कळविण्यात आले आहे.

निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. कुडाळ , जि. सिंधुदूर्ग येथील वनजमीन वळती करणे प्रस्ताव १८.९४ हे. असून ९.५५ हे. वनसंज्ञा क्षेत्र व ९.३९ हे. वन क्षेत्र आहे. ९.५५ हे.वनसंज्ञा क्षेत्र हे खाजगी हक्कदारांच्या मालकीचे असून सदर क्षेत्राच्या भूसंपादना करीता भूमीसंपादन, पुनर्वसन, पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये भूसंपादन प्रस्ताव क्र. ५/२०२२ उपजिल्हाधिकारी भूसंपादन जिल्हा मुख्यालय (ल.पा.), सिंधुदुर्ग कार्यालया मार्फत प्रगतीत आहे. सदर अधिनियमानुसार भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर असून खाजगी हक्कदारांच्या जमिनीच्या प्रस्तावित भूसंपादन प्रक्रिये अंतर्गत सदर खाजगी हक्कदारांना प्रचलित नियमानुसार प्रकल्प यंत्रणेकडून जमिनीचा आवश्यक मोबदला देण्यात येईल.

सद्यस्थितीत भूसंपादन २०१३ अधिनियमानुसार भूसंपादन प्रक्रिया प्राथमिक स्थितीत प्रगतीत असून सदर खाजगी व्यक्तींचे सहमतीपत्र घेणे सदर अधिनियमानुसार अपेक्षित नसल्याने सदर सहमतीपत्र सादर करणे बाबत कार्यवाही करता येत नाही.

हे आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

( म. श्री. कदम )
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग,
ओरोस, सिंधुदुर्गनगरी.

प्रत:- मा. अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सिंधुदूर्गनगरी यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:-उपविभागीय अभियंता, पाटबंधारे बांधकाम उपविभाग क्र.१ कणकवली यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.